शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**तक्रार अर्ज क्रं. १८/२०२२**

**तक्रार अर्ज क्रं. १९/२०२२**

**तक्रार अर्ज क्रं. २०/२०२२**

**तक्रार अर्ज क्रं. २१/२०२२**

१. विक्रम अनंत माने
मु.पो.करनूर, रामकृष्णनगर,
ता.कागल, जि.कोल्हापूर

२. श्रीमती रूपाली रमेश जगताप
९४०, चंद्रमणी अपार्टमेंट,
प्लॅट ६, रणझुंझार चौक, गावभाग, सांगली.

३. श्रीमती सुनिता सुनिल शिंदे
मु.पो. कृष्णानगर(हाळगे/कारंदवाडी),
ता.वाळवा,जि.सांगली.

४. श्रीमती मधूरा मकरंद रास्ते
१७६६, व्यंकटेश वर्धन,
सिव्हील हॉस्पिटल रोड, गणेशनगर, सांगली

} तक्रारदार

विरूध्द्

१. अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग
ॲंड टेक्नॉलॉजी, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली

२. संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्था, इस्लामपूर,
ता. वाळवा, जि. सांगली

} वि. प

अण्णासाहेब डांगे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली यांचेकडील वरील तक्रारदार शिक्षक व शिक्षिका यांनी दि.०१/०६/२०२२ रोजी तक्रार निवारण समितीकडे स्वतंत्ररित्या तक्रार अर्ज दाखल केले आहेत. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

**तक्रारीचे स्वरूप :**

तक्रारदार क्रं. १ यांनी १.या महाविद्यालयात दिले जाणारे वेतन हे शासन नियमाप्रमाणे मिळालेले नाही. त्यामुळे शासन नियमाप्रमाणे वेतनातील फरक व्याजासहित देण्याबाबत आदेश देण्यात यावेत. २. वर्ष २०१९ ते २०२२ या कालावधीमध्ये वार्षीक वेतनवाढ दिली गेलेली नाही. वार्षिक वेतनवाढ देण्याबाबत आदेश देणेत यावेत अशी तक्रार नमूद केली आहे.

तक्रारदार क्रं. २ यांनी १. या महाविद्यालयात दिले जाणारे वेतन हे शासन नियमाप्रमाणे मिळालेले नाही. त्यामुळे शासन नियमाप्रमाणे वेतनातील फरक व्याजासहित देण्याबाबत आदेश देण्यात यावेत. २. वर्ष २०१९ ते २०२२ या कालावधीमध्ये वार्षीक वेतनवाढ दिली गेलेली नाही. वार्षिक वेतनवाढ देण्याबाबत आदेश देणेत यावेत. ३. जून २०१९ मध्ये संबधित विषयामध्ये पीएच डी मिळवली त्याकरिता नियमानुसार ३ ते ५ वार्षिक वेतनवाढ द्यायला हव्या होत्या. त्या दिल्या गेल्या नाहीत. त्या देण्याबाबत आदेश व्हावेत अशी तक्रार नमूद केली आहे.

तक्रारदार क्रं. ३ व ४ यांनी १. या महाविद्यालयात दिले जाणारे वेतन हे शासन नियमाप्रमाणे मिळालेले नाही. त्यामुळे शासन नियमाप्रमाणे वेतनातील फरक व्याजासहित देण्याबाबत आदेश देण्यात यावेत. २. वर्ष २०१९ ते २०२२ या कालावधीमध्ये वार्षीक वेतनवाढ दिली गेलेली नाही. वार्षिक वेतनवाढ देण्याबाबत आदेश देणेत यावेत. ३. कोरोना महामारीच्या काळामध्ये तांत्रिक शोध निबंध लिहीणेचे सक्तीचे करणेत आले. व सदर शोध निबंध सादर केला नाही म्हणून मे २०२१ या महिन्यातील निम्मे वेतन नियमबाहय कपात करण्यात आले. सदरचे वेतन कपात केलेले वेतन परत मिळणेबाबत आदेश देण्यात यावे अशी तक्रार नमूद केली आहे.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

महाविद्यालयाने दि.०७ जून २०२२ रोजी दिलेल्या अभिप्रायामध्ये या सर्व तक्रारदार यांचेसाठी कार्यभार उपलब्ध नसल्याने त्यांचे पद रद्द करण्यात आले असून त्यांना दि.३१/०५/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. त्यामुळे, तक्रारदार हे दि.०१/०६/२०२२ पासून आमच्या महाविद्यालयात कार्यरत नाहीत. या पत्राव्द्वारे, आपणास विनंती आहे की, तक्रारदार दि.०१/०६/२०२२ पासून सेवेत नसल्याने त्यांचा दि.०१/०६/२०२२ रोजी करण्यात आलेला तक्रार अर्ज, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ५(३८), ५३(xii) व (xiv) ५७ आणि ५९ मधील तरतुदीनुसार फेटाळण्यात यावा, ही विनंती.

# आदेश

उपर निर्देशित तक्रार अर्ज केवळ एकाच तांत्रिक मुद्यावरून खारीज करता येवू शकत असल्यामुळे ते एकत्र सादर करण्यात येऊन त्या त्या एकत्र संयुक्त आदेशान्वये निकाली काढण्यात येत आहेत. या सर्व तक्रार अर्जामध्ये तक्रारदारांनी महाविद्यालयातून दिले जाणारे वेतन शासन नियमाप्रमाणे दिले जात नसून वेतनातील फरक देण्याचा आदेश देण्यात यावा, संबंधीत कालावधीमधील वार्षिक वेतनवाढ दिली गेली नसून ती वेतनवाढ देण्याचे आदेश देण्यात यावेत तसेच काही तक्रार अर्जामध्ये संबंधित विषयात पीएच.डी. मिळालेली असून देखील नियमानुसार ३ ते ५ वेतनवाढी तात्काळ द्यावयास हव्या होत्या परंतू त्या दिल्या नसून त्याबाबतही आदेश द्यावेत अशी मागणी केली आहे. तक्रार दाखल करतेवेळी संबंधित संस्थेने या सर्व तक्रारदारांना दि.३१.०५.२०२२ रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त केले असून दि.०१.०६.२०२२ पासून ते महाविद्यालयामध्ये कार्यरत नाहीत. सबब, प्रस्तूतची तक्रार महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम ५(३८), कलम ५३ (xii) आणि (xxiv), ५७ आणि ५९ मधील तरतूदीनुसार फेटाळण्यात यावेत अशी मागणी केली आहे. या तक्रारदारांना कार्यमुक्त केल्याबाबतच्या पत्राची प्रतदेखील सोबत जोडली आहे. या सर्व तक्रारदारांना विचारणा केली असता त्यांना दि.३१.०५.२०२२ रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त केले असल्याबाबतचे पत्र त्यांना मिळाले असल्याचे त्यांनी समितीसमोर मान्य केले आहे. तथापि, ते पत्र त्यांना दि.०१.०६.२०२२ रोजी मिळाले असल्याचे नमूद केले आहे. तसेच या सर्व तक्रारदारांनी आपल्याला कार्यमुक्त केल्याचे आदेशा विरूध्द् मे.विद्यापीठ न्यायाधीकरणासमोर प्रकरण दाखल केले असल्याचे निवेदन या समितीसमोर केले आहे. या सर्व तक्रारदारांनी ही तक्रार दि.०१.०६.२०२२ ला समितीकडे दाखल करण्याकरीता सादर केले असल्याचे अभिलेखनात दिसून येते. ज्या रोजी ही तक्रार दाखल केली त्या रोजी आणि वेळेस तक्रारदार सेवेत नव्हते ही बाब तक्रारदारांना मान्य आहे. यावर महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, २०१६ कलम ७९ चा विचार करता सदर कलमाखाली आणि सदर कायद्याखाली केवळ सेवेत असणारे प्राध्यापक आणि विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचारी, सदर कलमाअंतर्गत या तक्रार समितीसमोर ज्या प्रकरणात विद्यापीठ न्यायाधिकरणाकडे प्रकरण दाखल करता येत नाही अशाच प्रकरणामध्ये तक्रार दाखल करू शकतात. कर्मचारी या शब्दाचा अर्थ सेवेत असणारे कर्मचारी असाच होतो. कर्मचारी या शब्दात सेवेत नसणारा हे अभिप्रेत नाही. सेवेतून निष्काषीत केलेले कर्मचारी हे कर्मचारी संज्ञेत केवळ औद्योगिक विवाद कायद्याच्या संबंधित कलमांखाली येऊ शकतात आणि त्याला त्या कायद्याखाली आपले निष्कषण चॅलेंज करण्याचा अधिकार येतो. ही संज्ञा महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, २०१६ मध्ये अभिप्रेत आहे.

सबब, प्रस्तूत तक्रारदार ही तक्रार या समितीसमोर मांडू शकत नाही असे समितीचे मत आहे. प्रस्तूत तक्रार अर्ज खारीज करावा लागेल. तो खारीज करण्यात येते आहे.

आदेशाची मूळ प्रत तक्रार अर्ज क्र.१८/२०२२ मध्ये ठेवण्यात यावी व त्याची प्रत तक्रार अर्ज क्रं.१९/२०२२ ते २१/२०२२ मध्ये ठेवण्यात यावी.

दिनांक : 24 AUG 2023

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे )

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच. कोलेकर )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)